# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**कल्पतरू पॉईट, २/३ व ४ था मजला, शीव**
**माटुंगा स्किम नं ८, शीव (पूर्व), मुंबई-४०० ०२२.**

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

दिनांक २८/०८/२०२४

## जाहिरात

मुख्यमंत्री पर्यावरण तथा शाश्वत विकास टास्क फोर्स, महाराष्ट्र शासन यांच्या अधिनस्त गठीत केलेल्या कार्यकारी समितीच्या अध्यक्षांच्या कार्यालयामधील खालील पदे निव्वळ कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी पात्र उमदेवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर कंत्राटी पदांचा तपशील, पदांची संख्या, सदर पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, आवश्यक अनुभव व पदाचे मानधन इत्यादी बाबत तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र | पद | शैक्षणिक पात्रता | अनुभव | कमाल वयोमर्यादा | प्रस्तावित जागा | प्रस्तावित वेतन प्रति महिना (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जनसंपर्क अधिकारी<br>Public Relations Officer | कोणत्याही शाखेची पदवी व पत्रकारितेमध्ये पदव्युत्तर पदविका<br><br>Bachelor's degree in any discipline and Post graduate Diploma in Journalism | पत्रकारिता क्षेत्रात १० वर्षाचा अनुभव कृषी पत्रकारितेमधील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.<br><br>10 years of experience in Journalism with preference to candidate's having experience in the field of Agro-journalism | ४५ | ०१ | ६०,००० |
| २ | क्षमता बांधणी तज्ञ<br>Capacity Building Expert | समाजकार्य विषयातील पदव्युत्तर पदवी<br>Master of Social Work (MSW) | सामाजिक विकास, कृषी, पर्यावरण, समुपदेशन आणि क्षमता बांधणी क्षेत्रात ५ वर्षाचा अनुभव<br>Five years of professional experience in social development, agriculture, environment, counselling & capacity building | ४० वर्ष | ०१ | ७५,००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | जल तज्ञ<br>Water expert | पर्यावरणशास्त्र/ रसायनशास्त्र/पर्यावरण नीती/जल नीती या विषयातील पदव्युत्तर पदवी<br><br>M.Sc. in Environmental Science /Chemistry Master's degree in Environmental Policy /Water Policy | जलसंपत्ती व्यवस्थापन, सामाजिक, शाश्वत विकास उपक्रम इत्यादी क्षेत्रात ५ वर्षाचा अनुभव<br><br>Five years of experience in water resource management, social and sustainable development activities etc. | ३५ वर्ष | ०१ | ७५,००० |
| ४ | वृक्षारोपण तज्ञ<br>Plantation Expert | कृषी शाखेतील पदवी, कृषी/ वनस्पतीशास्त्र या विषयातील पदव्युत्तर पदविका<br><br>Bachelor's degree in Agriculture, Post graduate Diploma in Agricultural or Botany | कृषी, पर्यावरण, वृक्षलागवड इत्यादी क्षेत्रात ५ वर्षाचा अनुभव<br><br>Five years of experience in agriculture, environment and tree plantation activities. | ४० वर्ष | ०१ | ६०,००० |

अटी व शर्ती :

१. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा नागरीक असावा.
२. संगणक हाताळणी व इंटरनेटचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील.
३. उच्चतम वयोमर्यादा दिनांक ०१/०८/२०२४ रोजीची ग्राहय धरण्यात येईल.
४. जाहिरातीतील सर्व पदे ही राज्य शासनाची नियमित पदे नसून सदर पदे ही मुख्यमंत्री पर्यावरण तथा शाश्वत विकास टास्क फोर्ससाठी निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही.
५. सदर नियुक्ती प्रथमतः ११ महिन्यांसाठी राहील. त्यानंतर शासन मान्यतेने आवश्यकतेनुसार पुनर्नियुक्ती /मुदतवाढ देण्यात येईल.

उमेदवारांकरिता सर्वसाधारण सूचनाः

१. सदर पदासाठी अर्जाचा नमुना www.mpcb.gov.in/recruitment या लिंकवरुन Download करुन सदर अर्जामध्ये छायाचित्रासहीत परिपूर्ण अर्ज recruitment@mpcb.gov.in या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावेत.
२. पोस्टाने व प्रत्यक्ष दिलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
३. ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव ठळकपणे नमूद केलेले असावे.
४. अर्जासोबत उमेदवाराने आपला ई-मेल आयडी नमूद करणे अनिवार्य आहे व इतर संपूर्ण माहिती,(शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे/प्रमाणपत्रे, अनुभव इ.) जोडणे आवश्यक आहे.
५. अर्जासोबत मुळ कागदपत्रे जोडू नयेत फक्त स्वसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडण्यात याव्यात.
६. ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी दिनांक २७/०८/२०२४ ते ०६/०९/२०२४, संध्या.०५.०० वाजेपर्यंत असा आहे. या कालावधीमध्ये प्राप्त अर्जाचाच विचार करण्यात येईल.
७. पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी फक्त ई-मेल द्वारे कळविण्यात येईल.

**सदस्य सचिव**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**